स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानवविद्या शाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. (आचार्य) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

* संशोधन विषय *

“डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैद्राबाद मुक्तीसंग्राम : एक चिकित्सक अध्ययन”

* संशोधक *

बनसोडे प्रदीप बालासाहेब

गुगळी धामणगांव ता. सेलू जि. परभणी.
इ-मेल : bansode4141@gmail.com

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ. नितीन बावळे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी

इतिहास अभ्यासमंडळ सदस्य स्वा.रा.ती.म.वि., नांदेड.

* संशोधन केंद्र *

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी.

ऑगस्ट 2021

प्रस्तावना :-

स्वातंत्र्य पुर्व काळात भारतात जवळपास ६०० लहानमोठी संस्थाने होती. संस्थानिकांना अंतर्गत कारभारात कमी अधिक स्वायत्तता होती. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र होताच त्यांच्यावरील इंग्रजी सार्वभौमत्व संपुष्टात आले, तथापि बदलत्या परिस्थितीत आपले स्वतंत्र अस्तित्व टिकविणे अशक्य आहे, याची जाणीव अनेक संस्थानिकांना होती. संस्थानांचे भारतात विलीनीकरण करुन तेथे लोकशाही व्यवस्था निर्माण करण्यासाठी अनेक संस्थानांमध्ये जनतेची आंदोलने चालू होती. तेव्हा १५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच यांतील अनेक संस्थानिकांशी वाटाघाटी करुन आपली संस्थाने भारतात विलीन करण्याविषयी त्यांची मने वळविण्यात आली.

१५ ऑगस्ट १९४७ पूर्वीच हैद्राबाद, जुनागढ आणि जम्मू-कश्मीर यांचा अपवाद वगळता भारताच्या सीमांतर्गत इतर संस्थानिकांनी भारतात विलीन होण्यासंबंधीच्या करारावर सह्या केल्या. यापैकी २१६ लहान संस्थाने ती ज्या राज्यांच्या सीमांतर्गत होती, त्यात पुर्णत: विलीन करण्यात आली. ६१ संस्थानांचे रुपांतर केंद्रशासित प्रदेशात करण्यात आले, तर २७५ संस्थानांचे एकत्रीकरण करुन त्यांची पाच राज्ये - १) मध्य भारत, २) पतियाळा आणि पूर्व पंजाब येथील संस्थानाचा संघ, ३) राजस्थान, ४) सौराष्ट्र आणि, ५) त्रावणकोर-कोचीन, स्थापन करण्यात आली. म्हैसुर संस्थानास ब गटातील राज्याचा दर्जा देण्यात आला.

हैद्राबाद संस्थानाची निर्मिती ही अनेक वर्षे अगोदर झाली होती. इ. स. १७२४ पासून ते इ. स १९४८ पर्यंत हैद्राबाद संस्थानामध्ये "आसफिया" घराण्याची सत्ता होती. हैद्राबाद राज्याचा व आसफिया घराण्याचा संस्थापक मीर कमरुद्दीन उर्फ निजाम उल - मुल्क हा होता. त्याने १७२४ मध्ये हैद्राबाद या ठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या स्वतंत्र स्थापन केलेल्या राज्यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटक या प्रदेशांचा समावेश होता. या राज्याच्या गादीवर वंशपरंपरेने येणाऱ्या सत्ताधिशाला निजाम असे संबोधले जात असे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला, परंतु निजामाने आपले हैद्राबाद राज्य स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली. निजाम हा खूप अन्यायी व अत्याचारी होता. त्यामुळे देशाच्या ऐन मध्यभागी असलेले हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राहणे हे भारताच्या दृष्टीकोनातून हिताचे नव्हते.

त्यामुळे हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणासाठी या राज्यातील जनतेने ७ ऑगस्ट १९४७ रोजी संघटीतपणे सशस्त्र आंदोलनास सुरुवात केली. या आंदोलनात संस्थानातील जनतेने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील मागासलेल्या, समाजात हीन समजल्या जाणाऱ्या, जातीभेदाचे चटके सहन करणाऱ्या, शोषित, पीडीत अशा दलित समाजाचे पुढारी होते. त्यांनी भारतातील दलितांच्या विकासासाठी दिवस-रात्र कष्ट घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुध्दा हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन व्हावे यासाठी पाठींबा दर्शविला. मराठवाड्यातील दलित वर्गाने त्यांच्याच नेतृत्वाखाली हैद्राबाद मुक्तीसंग्रामामध्ये सहभाग घेतला. या संस्थानाच्या प्रत्यक्ष कारवाई वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सरदार वल्लभभाई पटेल यांना खंबीररित्या पाठींबा दर्शविला होता. या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व निजामाचा संबंध आला होता. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी निजामाला गंभीर इशाराही दिला होता. निजामाने आपले संस्थान संघराज्यात विलीन न केल्यास त्याचे दुष्परिणाम खूप गंभीर होतील असा इशाराही त्यांनी दिला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जसा संपुर्ण भारताच्या विकासाचा ध्यास होता, तसाच त्यांना संस्थानातील जनतेच्या विकासाचाही ध्यास होता. त्यांनीच संस्थानातील जी सामान्य जनता होती, त्यांच्या शिक्षणासाठी, शिक्षणाच्या विकासासाठी सर्वप्रथम प्रयत्न केले.

*** संशोधन विषयाची आवश्यकता व महत्व :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतातील दलितांचे पुढारी व प्रमुख नेते होते. सुरवातीपासूनच त्यांनी दलितांच्या हक्कांसाठी आंदोलने करण्यास सुरुवात केली होती व त्यात त्यांना चांगल्या प्रकारे यशही मिळाले होते. १९४१ च्या जनगणना अहवालानुसार हैद्राबाद या संस्थानाची लोकसंख्या ही एक कोटी त्रेसष्ठ लाख अडतीस हजार पाचशे चौतीस एवढी होती. त्यापैकी जवळपास एकोणसाठ लाख अठ्ठावीस हजार हे दलित लोक होते. हैद्राबाद संस्थानातील दलित लोकांवर मुस्लिम तसेच हिंदूचे अत्याचार होत राहिले.

इ. स. १९२७ नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हैद्राबाद संस्थानाशी संबंध येत गेला. त्यांनीच हैद्राबाद राज्यातील दलितांमध्ये सामाजिक तसेच राजकीय प्रबोधन घडवून आणले. त्यासाठी त्यांनी मराठवाड्याच्या सीमाक्षेत्रांत येवला, तडवळा-ढोकी व मकरणपूर येथे दलितांच्या सभा घेतल्या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील जनतेसाठी आपल्या कार्यातून कोणत्या प्रकारचे योगदान दिले आहे व हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला त्यांनी कशाप्रकारे पाठिंबा दिला, त्यामध्ये त्यांनी आपले कोणते योगदान दिले हे या शोध प्रंबधातून आणखी शास्त्रीय व ऐतिहासिक दृष्टीकोनातून उजागर करण्यासाठी व त्यायोगे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हैद्राबाद संस्थानातील योगदानाचा अभ्यास करण्यासाठी मी पीएच.डी. च्या प्रबंधासाठी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैद्राबाद मुक्तीसंग्राम : एक चिकित्सक अध्ययन" हा विषय निवडला आहे.

*** संशोधानाची उद्दिष्टे :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्यांना, वंचितांना प्रवाहात आनण्याचे प्रयत्न केले. तसेच राजकीय स्वातंत्र्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही, हे ठासून सांगितले. त्यानुसार संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :-

१) हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढ्याला बाबासाहेबांचे जे वैचारिक पाठबळ मिळाले त्याचा मागोवा घेणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हैद्राबाद संस्थानाबद्दलचा मानवतावादी दृष्टीकोन समजून घेणे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानात केलेल्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व निजामाच्या संबंधाचे विश्लेषण करणे.

५) हैद्राबाद संस्थानातील दलितांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याचा आढावा घेणे.

६) हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय दृष्टीकोन समजून घेणे.

७) हैद्राबाद मुक्तीसंग्राम लढ्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धार्मिक दृष्टीकोन समजून घेणे.

८) हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

* संशोधनाची गृहीतके :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील अस्पृश्य समाजासाठी, समाजाच्या विकासासाठी खुप कष्ट सोसले. त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामाला पाठींबा दर्शविला. यावरुन संशोधनाची गृहीतके पुढील प्रमाणे :-

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला पाठींबा देऊन सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील जनतेच्या शैक्षणिक विकासासाठी प्रयत्न केले.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते राजकीय दृष्टीने हैद्राबाद संस्थान भारतात समाविष्ट होणे गरजेचे होते.

४) "स्वतंत्र भारत, अखंड भारत" हे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात होते.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थान भारतात विलीन व्हावे यासाठी पाठिंबा दिला.

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील दलितांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता आणि स्वातंत्र्यासाठी दलितांना धर्मांतर हाच एकमेव उपाय असल्याचे प्रतिपादन केले.

८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा सीमाभागात सभा व परिषदा घेऊन जनतेला संघटित बनविले.

*** संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

प्रस्तुत विषयाचा मुख्य हेतू म्हणजे संशोधानाच्या मर्यादा स्पष्ट कराव्या लागतात. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर व हैद्राबाद मुक्तीसंग्राम : एक चिकित्सक अध्ययन" या विषयाची व्याप्ती आंबेडकर काळ ते ६ डिसेंबर १९५६ ही असली तरीही, विषयाच्या अनुषंगाने काही बदल होऊ शकतात.

*** संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत संशोधन विषयासाठी चिकित्सक संशोधन पध्दतीचा अवलंब करुन प्राथमिक, द्वितीय स्त्रोतांमधून माहिती संकलित केली जाईल. त्याचप्रमाणे हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील भागातील ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन, ऑनलाईन साधनांद्वारे त्या विषयीची महत्वपूर्ण माहिती संकलित केली जाईल. तत्कालीन वर्तमानपत्रे व त्याकाळातील घडामोडींवर आधारीत ग्रंथांचा चिकित्सकपणे अभ्यास करुन संशोधन कार्य केले जाईल व त्याचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करुन निष्कर्ष स्थापित केले जातील.

*** संशोधन विषयाचा आढावा :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संपुर्ण भारतभर अस्पृश्य समाजाला अधिकार मिळावेत यासाठी वेगवेगळ्या प्रकारची त्यांनी आंदोलने केली. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर भारतात सामिल न झालेले हैद्राबाद संस्थान भारतात सामिल व्हावे यासाठी त्यांनी मौलिक असे मार्गदर्शन व कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हैद्राबाद लढ्याला पाठींबा दर्शवून मानवतावाद, राजकीय, सामाजिक, धार्मिक समता व अधिकार या मुल्यांची जोपासना केली. याबाबत या संशोधनामार्फत विशेष प्रकाश टाकला जाईल की, जो आजतागायत दुर्लक्षित राहीलेला भाग आहे -

*** प्रकरण रुपरेषा :-**

प्रस्तुत शोध प्रबंधाची एकुण पाच प्रकरणांत मांडणी करण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहे :

१) प्रस्तावना :-

या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन विषयाची प्रस्तावना मांडण्यात येईल, विषय निवडीचा हेतू, विषयाची मर्यादा व महत्व, संशोधनाची उद्दीष्ट्ये, गृहितकृत्ये, तथ्य संकलन व संशोधन पध्दती या संदर्भात स्पष्टीकरण देण्यात येईल.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनचरित्र :-

प्रस्तुत प्रकरणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म, बालपण, शिक्षण, कौटूंबिक जीवन, त्यांची कामगिरी इत्यादी उपघटकांच्या संदर्भात वस्तुनिष्ठपणे अभ्यास करुन मांडणी करण्यात येईल.

३) हैद्राबाद मुक्तीसंग्राम (पार्श्वभुमी) :-

प्रस्तुत प्रकरणातून हैद्राबाद मुक्तीसंग्रामची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात येईल.

४) हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान असे तत्वज्ञानी होते. त्यांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला दिलेल्या वैचारिक पाठबळाचा व त्यांच्या योगदानाचा समावेश करण्यात येईल.

५) निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातून शोधप्रबंधाच्या लेखनासाठी निवडलेली गृहीतके व उद्दीष्ट्ये यांच्या अनुषंगाने अभ्यासाअंती काढलेले निष्कर्ष येथे मांडण्यात येतील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामाला कशाप्रकारे पाठींबा दर्शविला याचा सुक्ष्म व वस्तुनिष्ठ पध्दतीने अभ्यास करुन सारांशरुपाने येथे निष्कर्ष मांडण्यात येतील.

*** संदर्भग्रंथ :-**

१) अनंत भालेराव, हैद्राबाद स्वातंत्र संग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद १९९७.

२) डॉ. अनिल कोठारे, मराठवाड्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन नांदेड, १९९९.

३) डॉ. एस. एस. नरवडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैद्राबाद संस्थान, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८८.

४) डॉ. ल. या. औचरमल, आंबेडकरी चळवळ आणि हैद्राबाद संस्थानातील दलित मुक्ती संग्राम, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९७.

५) धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९९२.

६) नरहर कुरुंदकर, हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन, मराठी साहित्य परिषद, सुलतानबझार, हैद्राबाद, १९८५.

७) नरेंद्र गायकवाड, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन पुणे, १९९०.

८) प्रा. मा. फ. गांजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड १, प्रज्ञा प्रकाशन, नागपूर, १९६८.

९) वसंत पोतदार, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, कासारशिरसी, १९८२.

१०) सूर्यवंशी, टाकळगव्हाणकर, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, सांगाती प्रकाशन, नांदेड, १९८५.

*** English Reference Books :-**

1) Communist menance in Hyderabad - Pathak D.L., 1949.

2) Freedom Struggle in Hyderabad Vol.IV - Ramesh N., 1966.

3) Hyderabad and British Paramountcy - Bharati Ray, Oxford Uni. Press, New Delhi, 1988.

4) Hyderabad Struggle - Abbu Salem, Hyderabad, 1941.

5) Operation Polo : Police Action Against Hyderabad, Prasad M.N., Ministry of Defence Pub., 1948.

6) The End of an Era : Hyderabad, Popular, Bombay, 1983.

7) The Tragedy of Hyderabad - Laik Ali, Pakistan, 1948.

8) Wavell, The Viceroy Journal - Moon Pandal, Oxford, 1973.

9) www.scihub

10) www.googlescholar.com

11) www.researchget.com

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. नितीन बावळे,

संशोधक विद्यार्थी

बनसोडे प्रदीप बालासाहेब

गुगळी धामणगांव ता. सेलू जि. परभणी